Shri Sharada Bhavan Education Society's
**YESHWANT MAHAVIDYALAYA, NANDED-431602 (M.S.)**
(Affiliated to Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded)
**NAAC Reaccredited "A" Grade**
'COLLEGE WITH POTENTIAL FOR EXCELLENCE STATUS'
(Arts, Science, Commerce, BCS, PG-Economics, History, English, Sociology, Mcom, Chemistry, Zoology, Env.Sc., Micro., Compt., Dairy, MCM, Info.Tech., Bio.Tech. & Research Facility in History, Economics, Pol.Sc., Phy., Chem., Botany, Zoology, Commerce, Hindi, Env.Sc., )
Establishment Year: 1963

| Hon'ble Ashokrao Chavan | Shri D.P.Savant | Dr.Ganeshchandra Shinde |
|---|---|---|
| President | Secretary | Principal |

Phone No.s:- (02462) 254170, 254487(Office), 253726(Fax)
**website: www.ymnnanded.in Email: principalymn@gmail.com**

Ref.No.: 2020-2021/ Date:26.07.2021

# उन्हाळी २०२१ परिक्षेसंदर्भात महत्वाची सुचना

(स्वा.रा.ती.म.विद्यापीठ नांदेड यांचे परित्रक दिनांक २४.०७.२०२१)

वरिष्ठ महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या सर्व विद्यार्थ्यांना संदर्भीय परिपत्रकानुसार सुचित करण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांना उन्हाळी २०२१ ही परिक्षा ऑफलाईन देण्याची इच्छा आहे त्यांनी त्यांचे ऑफलाईनचे संमतीपत्र महाविद्यालयात दिनांक २८ जुलै २०२१ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावेत.

ज्या विद्यार्थ्यांनी उन्हाळी २०२१ या परिक्षेसाठी ऑफलाईन संमतीपत्र सादर केले नाही. त्यांची परीक्षा ऑनलाईन पध्दतीने होणार याची, नोंद घ्यावी.

वरिल निर्णयाप्रमाणे विद्यार्थ्यांने ऑनलाईन किंवा ऑफलाईन पध्दतीने परीक्षा देण्यासंदर्भात संमतीपत्र दिल्यानंतर अशा विद्यार्थ्यांना एकाच पध्दतीने परीक्षा देता येईल. ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन व ऑफलाईन अशा दोन्ही परीक्षा देण्याचा प्रयत्न केल्यास त्या विद्यार्थ्यांवर विद्यापीठ नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

प्राचार्य
**PRINCIPAL**
**Yeshwant Mahavidyalaya**
**NANDED.**

।। सा विद्या या विमुक्तये ।।

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

**Phone : (02462) 229294** **OFFICE OF THE DIRECTOR BOE&E** **Website: srtmun.ac.in**

**Fax : (02462) 229520** **E-mail: directorboee@srtmun.ac.in**

जा.क्र. संपवमूमं/पवमूमंबैठक/२०२१-२२/२७१ दिनांक : २४/०७/२०२१

**तातडीचे परीपत्रक**

प्रति,

**मा. प्राचार्य,**

सर्व संलग्नित पदवी,पदव्युत्तर महाविद्यालये

प्रस्तुत विद्यापीठ

**विषय : उन्हाळी २०२१ च्या परीक्षा ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने घेणेबाबत.**

**संदर्भ :** १. विद्यापीठ अनुदान आयोगाचे पत्र क्रमांक D.O. No.F.1-1/2021(Secy)Date : 16 July 2021.

२.उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांचे दि. २३/०७/२०२१ रोजीच पत्र.

३. मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड, लातूर,परभणी व हिंगोली यांचे प्राप्त पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयी व संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, आज दि. २४/०७/२०२१ रोजी संपन्न झालेल्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या तातडीच्या बैठकीतील निर्णयानुसार खालीलप्रमाणे निर्णय कळविण्यात येत आहे.

१. प्रस्तुत विद्यापीठाच्या सर्व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या उन्हाळी २०२१ ऑनलाईन पध्दतीने होणा-या परीक्षा हया विद्यापीठ अनुदान आयोग,उच्च व तंत्रशिक्षण विभाग मंत्रालय मुंबई व विद्यापीठ कार्यक्षेत्रातील चारही जिल्हयातील मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड, लातूर,परभणी व हिंगोली यांचे मान्यतेने या परीक्षा **ऑनलाईन आणि ऑफलाईन** पध्दतीने घेण्यात येणार आहेत.

२. वरील निर्णयाप्रमाणे पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या उन्हाळी २०२१ परीक्षा ऑफलाईन पध्दतीने विद्यापीठाने निर्धारित केलेल्या परीक्षा केंद्रावर घेण्यात येतील.

३. वरील निर्णयाप्रमाणे जे विद्यार्थी **ऑनलाईन आणि ऑफलाईन** पध्दतीने परीक्षा देवु इच्छीतात अशा विद्यार्थ्यांनी त्यांचे संमतीपत्र संबंधीत महाविद्यालयामध्ये दि. २८/०७/२०२१ पर्यंत महाविद्यालयात सादर करावेत व अशा विद्यार्थ्यांचे संमतीपत्र महाविद्यालयाने विद्यापीठाच्या ऑनलाईन पोर्टलवर परीक्षा विभागाकडे दि. २९/०७/२०२१ पर्यंत सादर करावेत.

४. वरील निर्णयाप्रमाणे विद्यार्थ्यांने **ऑनलाईन किंवा ऑफलाईन** पध्दतीने परीक्षा देण्यासंदर्भात संमतीपत्र दिल्यानंतर अशा विद्यार्थ्यांना एकाच पध्दतीने परीक्षा देता येईल. ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन व ऑफलाईन अशा दोन्ही पध्दतीने परीक्षा देण्याचा प्रयत्न केल्यास त्या विद्यार्थ्यांवर विद्यापीठ नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

५. या परीक्षेसाठी विद्यापीठाने नेमलेल्या महाविद्यालयाने/परीक्षा केंद्रप्रमुखांनी ऑफलाईन परीक्षेसाठी सर्व विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था LAC प्रमाणे करण्यात यावी.

६. पदवी व पदव्युत्तर उन्हाळी २०२१ परीक्षा हया ऑफलाईन पध्दतीने परीक्षा केंद्रावर व क्लस्टर पध्दतीने महाविद्यालय स्तरावर घेतांना कोवीड १९ च्या पार्श्वभुमीवर केंद्रशासन,राज्य शासन व तसेच जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करुन परीक्षा सुरळीत पार पाडाव्यात.

७. पदवी अभ्यासक्रमांच्या प्रथम व व्दितीय वर्षाच्या क्लस्टर पध्दतीने होणा-या परीक्षेत बदल करण्यात येत असुन त्या सर्व परीक्षा **ऑनलाईन व ऑफलाईन** पध्दतीने खालील वेळापत्रकाप्रमाणे परीक्षा घेण्यात याव्यात. त्यानुसार क्लस्टर हेड प्रमुखांनी वेळापत्रकामध्ये बदल करावेत.

| अभ्यासक्रम | पुर्वीच्या परीक्षेच्या तारखा | परीक्षेच्या सुधारीत तारखा |
|---|---|---|
| बी.ए, बी.कॉम,बी.एस्सी व इतर अभ्याक्रमाच्या अंतिम वर्ष वगळुन क्लस्टर पध्दतीच्या परीक्षा | दि. २६/०७/२०२१ ते दि. १०/०८/२०२१ | दि. १७/०८/२०२१ ते दि. २७/०८/२०२१ |

८. पदवी अंतिम वर्षाच्या विद्यापीठाच्या वतीने घेण्यात येणा-या परीक्षा हया पुर्वनियोजीत वेळात्रकाप्रमाणे दि. ०५/०८/२०२१ पासुन तसेच पदव्युत्तर व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा हया दि. ११/०८/२०२१ पासुन **ऑनलाईन व ऑफलाईन** पध्दतीने घेण्यात येणार आहेत. या विद्यापीठामार्फत घेण्यात येणा-या परीक्षेच्या तारखेत कोणताही बदल नाही. ऑफलाईन पध्दतीने होणा-या या परीक्षा विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या परीक्षा केंद्रावर संपन्न होतील. या अंतिम वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या प्रवेशपत्रावर संबंधीत परीक्षा केंद्राचे नाव देण्यात आलेले आहे. तथापि याबाबत विद्यार्थ्यांना काही अडचण निर्माण झाल्यास संबंधीत विद्यार्थ्यांने आपल्या महाविद्यालयाशी संपर्क साधुन ऑफलाईन परीक्षेसाठी परीक्षा केंद्राबाबतची माहिती घ्यावी.

९. परीक्षा विभागाने यापुर्वीच जाहीर केलेल्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्ष वगळुन इतर वर्षाच्या परीक्षा हया क्लस्टर पध्दतीने घेण्यात येणा-या परीक्षांच्या तारखेत कोणताही बदल नसुन त्या परीक्षा पूर्वनियोजीत वेळापत्रकाप्रमाणेच दि. ०२/०८/२०२१ ते दि. १०/०८/२०२१ या दरम्यान होतील. तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्ष वगळुन इतर वर्षाच्या परीक्षा क्लस्टर पध्दतीने दि. ०५/०८/२०२१ ते दि. १४/०८/२०२१ या दरम्यान परीक्षा होणार आहेत. हया सर्व परीक्षा **ऑनलाईन आणि ऑफलाईन** पध्दतीने घेण्यात येतील.

**Phone : (02462) 229294** **OFFICE OF THE DIRECTOR BOE&E** **Website: srtmun.ac.in**
**Fax : (02462) 229520** **E-mail: directorboee@srtmun.ac.in**



१०.प्रस्तुत विद्यापीठातील सर्व संकुले तसेच उपकेंद्रातील अभ्यासक्रमांच्या परीक्षेत कोणताही बदल नसुन त्या परीक्षा पूर्वनियोजित वेळापत्रकाप्रमाणे घेण्यात येतील.

११.परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीतील वरील ठरावानुसार क्लस्टर पध्दतीने पदवी स्तरावरील प्रथम व व्दितीय वर्षाच्या परीक्षांचे वेळापत्रकात बदल झालेला असल्यामुळे अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र दि. ३१/०७/२०२१ पर्यंत विलंबशुल्कासह स्विकारण्यात येतील तसेच पदव्युत्तर व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या ज्या परीक्षा दि. ११/०८/२०२१ पासुन सुरु होणार आहेत त्या परीक्षांचे परीक्षा आवेदनपत्र विलंबशुल्कासह दि. २८/०७/२०२१ पर्यंत परीक्षा विभागात स्विकारण्यात येतील.

सबब, वरीलप्रमाणे उन्हाळी २०२१ च्या सर्व पदवी, पदव्युत्तर व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षा ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने घेण्यात येणा-या परीक्षेबाबतची माहिती सर्व संबंधीत विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे निदर्शनास आणुन दयावे, हि विनंती.

आपला,

**प्र- संचालक,**
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**<u>प्रत माहितीस्तव सादर :</u>**
मा. कुलगुरु महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.
मा.प्र-कुलगुरु महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.

**जनसंपर्क अधिकारी,प्रस्तुत विद्यापीठ :** यांना देवून कळविण्यात येते की सदर बातमी विद्यापीठ परिक्षेत्रातील चारही जिल्हयातील वर्तमानपत्रामध्ये विनामुल्य प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी.

# समती पत्र

प्रति,
मा.प्र.संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड.

विषय: हिवाळी—२०२० परीक्षेसाठी Online किंवा Offline परीक्षा देण्यासाठीचे समती पत्र

महोदय,

मी..............................................................................आपल्या विद्यापीठाशी संलग्नीत ..............................................या महाविद्यालयाचा विद्यार्थी आहे. हिवाळी—२०२०.....................................सत्राच्या परीक्षेसाठी, परीक्षा आवेदन पत्र विद्यापीठात सादर केले आहे. हिवाळी—२०२० परीक्षेसाठी मी खालील प्रमाणे सम्मतीपत्र लिहून देतो/देते की,

(अ) मी ऑनलाईन पध्दतीने परीक्षा देण्यास तयार असून, त्यासाठी माइयाकडे स्मार्ट फोन/लॅपटॉप/कॉम्पुटर/इंटरनेट कनेक्टीवीटी इत्यादीची सोय आहे व मी ऑनलाईन पध्दतीने घरी बसून परीक्षा देण्यास तयार आहे. माझा मोबाईल नंबर...................... असून व्हॉट्सप नंबर.......................... आहे. तसेच इमेल आय.डी................... ..................................हा आहे. करीता सम्मती पत्र भरून देत आहे.

(ब) मी ‘अ’ प्रमाणे ऑनलाईन पध्दतीने परीक्षा देणेसाठी माइयाकडे कोणतेही पुरेसे साधन नाही. त्यामुळे हिवाळी—२०२० ही परीक्षा मी ऑफलाईन पध्दतीने परीक्षा............... ......................................... देण्यास तयार आहे. करीता हे सम्मती पत्र भरून देत आहे.

आपला विश्वासू

विद्यार्थ्याचे नाव:.........................................
स्वाक्षरी..................................................
पत्ता:.......................................................
मोबाईल नंबर.............................................

**महाविद्यालयाची शिफारस:**
वरील प्रमाणे सम्मती पत्र पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषीत करण्यात येते
महाविद्यालयाचे प्राचार्य यांचा सही व शिक्का